सकाळ

# सहकार वाढीस मूलभूत तत्त्वांची गरज

## शेखर चरेगावकर : रवळनाथ हौसिंग फायनान्समध्ये सहकार परिषद

▸ सकाळ वृत्तसेवा




गडहिंग्लज : रवळनाथतर्फे आयोजित सहकार परिषदेत शेखर चरेगावकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एम. एल. चौगुले, जितेंद्र नाईक, रमेश कुरूणकर, डी. के. मायदेव उपस्थित होते.

गडहिंग्लज, ता. १७ : सहकार क्षेत्रात मोठे बदल झाले. परंतु त्याचा सकारात्मक परिणाम दिसत नाही. बदल स्वीकारला; पण सहकाराच्या मूलभूत तत्त्वांचा विसर पडला आहे. यामुळे बदलाबरोबर ही तत्त्वे आचरणात आणली तरच सहकार वाढेल व देशाच्या अर्थकारणाला बळ मिळेल, असे मत राज्य सहकारी परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय सहकार सप्ताहानिमित्त श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित सहकार परिषदेत 'सहकारातील नवे बदल' या विषयावर ते बोलत होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. गडहिंग्लज अर्बन बँकेचे अध्यक्ष जितेंद्र नाईक, आजरा अर्बनचे अध्यक्ष रमेश कुरूणकर, रवळनाथचे सीईओ डी. के. मायदेव यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. चौगुले म्हणाले, 'सहकार चळवळ देशासाठी उपयुक्त आहे. सहकार चळवळच अधिकाधिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकते. यामुळे खऱ्या अर्थाने व्यक्ती हिताचा विचार करणारे सहकार हे एकमेव मॉडेल आहे.' यावेळी आजरा अर्बनच्या अध्यक्षपदी निवडीबद्दल कुरूणकर यांचा सत्कार झाला. दत्तात्रय बरगे, रामाप्पा करिगार आदी उपस्थित होते. संचालक डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. जितेंद्र नाईक यांनी आभार मानले.

### भीमशक्तीचे विस्मरण

चरेगावकर म्हणाले, 'ग्रामीण भागात सहकारातून व्यवसायाची संधी आहे. तरुणांना मोठ्या प्रमाणात गावातच रोजगार मिळू शकतो. इतकी मोठी भीमशक्ती सहकारात आहे. परंतु, पाश्चिमात्य पगड्याखाली या भीमशक्तीचे विस्मरण झाले आहे.'